# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

'सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ'

महाविद्यालय विकास विभाग

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॅम्पस चौक ते अंबाझरी टी–पॉईंट मार्ग, नागपुर–४४० ०३३, दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२,२५२२३९०

Email ID : infoarcollege@ymail.com


क्र.रातुमनावि/म.वि.वि./ 6192 दिनांक:–28/ १२/२०२३.

प्रती,

प्राचार्य/ प्राचार्या,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

अति तात्काळ

विषय:– लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४
प्रमाणपत्र घेतल्याशिवाय वेतनदेयक स्विकारण्यात येवू नये याबाबत.

संदर्भ:–जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय, नागपूर यांचे पत्र क. अ.का १/निवडणूक–३/कावि–५९०/२०२३, दि. २८–१२–२०२३.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता मोठयाप्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता लागणार आहे याकरिता नागपूर जिल्हयातील महाविद्यालयीन सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा–यांची माहिती वेब पोर्टलवर भरण्याची कार्यवाही तातडीने करण्याची सुचना मा. निवडणूक आयोगाने दिलेल्या असून याबाबतचे प्रशिक्षण दि. २२–१२–२०२३ रोजी विद्यापीठात आयोजित करण्यांत आले होते. परंतु ब–याच महाविद्यालयानी त्यांच्या अधिनस्थ कर्मचा–यांची माहिती विहित केलेल्या एक्सल शिटमध्ये अद्यापही दिलेली नाही. याची गंभीर दखल निवडणूक आयोगाने घेतली असून महाविद्यालयातील सर्व कर्मचा–यांची माहिती एक्सल शिटमध्ये सादर केल्याबाबतचे प्रमाणपत्र घेतल्याशिवाय त्यांचे वेतन देयक स्विकारण्यात येवू नये असे नोडल अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी यांनी सहसंचालक यांच्या कार्यालयास दि. २८–१२–२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तरी आपणांस कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा–यांची माहिती तात्काळ एक्सल शिटमध्ये वेब पोर्टलवर सादर करण्यांत यावी. सदर माहिती सादर न केल्यास आपले महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा–यांवर कारवाई झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील. आपल्या सुलभ संदर्भाकरिता नोडल अधिकारी, मनुष्यबळ व्यवस्थापन तथा उपजिल्हाधिकारी, नागपूर यांचे पत्राची प्रत जोडलेली आहे.

कळावे.

आपला,

(डॉ. रमण मदने)
उपकुलसचिव (म.वि.वि.)

सहपत्र:– वरीलप्रमाणे

प्रतिलिपी:–

१. मा. नोडल अधिकारी, मनुष्यबळ व्यवस्थापन तथा उपजिल्हाधिकारी, भुसंपादन क्र. २, बिपाविमं, जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, नागपूर

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी,नागपूर यांचे कार्यालय
दुरध्वनीक्रमांक –0712-2541832,0712-2540094 Email – dydeonagpur@gmail.com

क्र.अ.का १/निवडणूक-३/कावि-५११/२०२३ दिनांक २८/१२/२०२३

निवडणूक प्राधान्य,

प्रति,

मा.सहसंचालक,
उच्च शिक्षण, नागपूर विभाग नागपूर

संदर्भ:- मा.अप्पर मुख्यसचिव तथा मा.मुख्य निवडणूक अधिकारी,महा.राज्य,मंत्रालय,मुबई यांची V.C दि.२०.१०.२०२३

विषय :- लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४
प्रमाणपत्र घेतल्याशिवाय वेतनदेयक स्विकारण्यात येवू नये याबाबत.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता मोठयाप्रमाणत मनुष्यबळाची आवश्यकता लागणार आहे. यासाठी नागपूर जिल्हयातील शासकीय/निमशासकीय/ महामंडळे/ शाळा/महाविद्यालय तसेच राज्य व केंद्र शासनाचे अखत्यारीतील सर्व कर्मचा-यांची माहिती वेब पोर्टलवर भरण्याची कार्यवाही तातडीने करण्याच्या सुचना मा.निवडणूक आयोगाने दिलेल्या आहे. यासाठी प्रत्येक कार्यालय प्रमुखानी त्यांचे अधिनस्त अधिकारी/कर्मचा-यांची माहिती एक्सल शिटमध्ये सादर करावयाची आहे. त्याबाबतचे प्रशक्षण दिनांक २२/१२/२०२३ रोजी घेण्यात आलेले असुन जिल्हयातील ब-याच अनुदानीत महाविद्यालयाकडे वेळोवेळी पाठपुरावा करुनही आद्यापही आपल्या अधिनस्त कर्मचा-यांची माहिती विहित केलेल्या एक्सल शिटमध्ये दिलेली नाही. निवडणूकी सारख्या संवेदनशील विषयाबाबत अशा प्रकारे अनास्था दाखविने अतिशय गंभीर आहे. सबब आपल्याकडील अनुदानीत महाविद्यालय यांच्याकडून प्राप्त होणारे माहे जानेवारी २०२४ देय होणा-या माहे डिसेंबर २०२३ च्या वेतन देयकासोबत अधिनस्त अधिकारी/कर्मचा-यांची माहिती एक्सल शिटमध्ये सादर केल्याबाबतचे प्रमाणपत्र घेण्यात यावे तसेच सदर प्रमाणपत्र घेतल्याशिवाय देयक स्विकारण्यात येवू नये ही विनंती.

नोडल अधिकारी
मनुष्यबळ व्यवस्थापन तथा
उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.2,
विपाविमं,नागपूर

प्रतिलीपी:-निबंधक,संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रपित.

नोडल अधिकारी
मनुष्यबळ व्यवस्थापन तथा
उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.2,
विपाविमं,नागपूर

Scanned with OKEN Scanner